# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/05/2023 (बुधवार) सायंकाळ


---

## भिवापुर येथील पेट्रोल पंप चालकांची हत्या करणारे आरोपी ४ तासात जेरबंद नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक १७/०५/२०२३ चे सकाळी १०.०० ते १०.१५ वा. दरम्यान भिवापुर ते नागभिड रोड वर असलेले भारत पेट्रोल पंप (पाटील पेट्रोल पंप) चे मालक दिलीप राजेश्वर सोनटक्के रा. दिघोरी नागपूर हे रात्री विक्री झालेल्या ईधनाचे पैशाचा हिशोब करीत आपल्या पेट्रोल पंपाच्या कार्यालयात बसले होते या दरम्यान एक मोटार सायकलवर आपल्या चेहऱ्यावर दुप्पटा बांधुन तिन इसम पेट्रोल पंपावर आले आपली गाडी पेट्रोल पंपाच्या कार्यालय समोर उभी करुन कार्यालयात घुसुन त्यातील एक ईसमाने दिलीप राजेश्वर सोनटक्के यांना चाकुने सपासप पोटावर वार करण्यात सुरुवात केली व त्यामधील एक ईसमाने हातात बंदुक दाखवून जिवे मारण्याची धमकी देत तेथील उपस्थित असलेल्या कर्मचारी यांना तुम सब लोग यहा से भाग जावो अशी धमकी दिली व एक तेथील कर्मचारी राजेश्वर नान्हे यांना जख्मी केले त्यामुळे तेथील इतर कर्मचारी वर्ग घाबरुन कार्यालयाचे बाहेर निघुन गेला. थोडया वेळात हल्ला करणारे तिघेही आपल्या मोटार सायकलने उमरेडच्या दिशेने निघुन गेले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी कार्यालयात चे आत जावून पाहीले असता त्यांचे मालक दिलीप राजेश्वर सोनटक्के वय ६० वर्ष रा. दिघोरी नागपूर हे गंभीर जख्मी अवस्थेत दिसून आले तसेच हिशोब करण्यात आलेले नगदी रुपये १,३४,०००/— रक्कम कॉऊंटरवर दिसून आले नाही. हल्ला करण्यात आलेले इसम हे आपल्या चेहऱ्यावर दुप्पटा बांधुन असल्याने त्यांना कोणीही ओळखून शकले नाही.सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप क्रमांक २१३/२०२३ कलम ३०२,३९४,३९७,३४ भादवि सहकलम ३,२५ भाहका दाखल करण्यात आला.

घटना अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्याने व आरोपी अनोळखी असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, यांनी संपुर्ण जिल्हयात अलर्ट घोषित केले विशेषत: पोलीस स्टेशन उमरेड यांना त्यांच्या हद्दीत नाकाबंदी लावुन आरोपीचा शोध घेण्यास निर्देश दिले असता अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले, पोलीस उप अधिक्षक (गृह) तसेच अतिरीक्त कार्यभार उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. संजय पुरंदरे यांचे मार्गदर्शनाखाली आरोपी शोध करिता स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन भिवापूरचे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे तसेच सहायक पोलीस निरीक्षक भस्मे व पोलीस स्टेशन उमरेड चे पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांनी वेग वेगळे तपास पथक तयार करण्यात आले. **पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत उमरेड पोलीसांनी नाकाबंदी करण्यास सुरू केली असता घटने वर्णनाची मोटरसायकल अडविली असता त्यातून घटनेतील आरोपीतांनी हे मोटरसायकल सोडुन जंगलाकडे त्यांनी पळ काढला त्यातील एक आरोपी नागपूरकडे जाण्यास यशस्वी झाला असता. उमरेड पोलीसांनी नाकाबंदी तसेच जंगलात सर्च ऑपरेशन राबवुन** १) शेख अफरोज उर्फ इमरान मौलाना शेख हनीफ वय ३३ वर्ष रा. रामचंद्र बाब मठाचे मागे मोठा ताजबाग नागपूर २) मोहम्मद वसीम उर्फ सोनु वल्द लालमोहम्मद अंसारी वय २७ वर्ष रा. ग्राम मंडई ता. लोहसिंगा जि. हजारीबाग झारखंड ह. मु. खरबी नागपूर यांना **ताब्यात घेवुन त्यांचेकडुन लुटण्यात आलेली रक्कम १,३४,०००/—रू. हस्तगत केले नागपूर येथुन बाहेर राज्यात पळुन जाण्याच्या तयारीने असलेला तिसऱ्या आरोपी** १) शेख जुबेर शेख कयुम वय २५ रा. मलीक शाळेच्या

समोर अख्तर ले आउट मोठा ताजबाग नागपूर **याला मोठा ताजबाग हद्दीतून ताब्यात घेण्यात स्थानिक गुन्हे शाखेतील पथक यशस्वी झाले. तसेच त्याचेकडुन एक जिवंत काडतुस सुद्धा जप्त करण्यात आले. घटनेचा पुढील तपास पोलीस स्टेशन भिवापूर कडुन करण्यात येत असुन हत्या कोणत्या कारणाने करण्यात आली हे निष्पन्न होणे बाकी असुन आरोपीचा पोलीस कस्टडी प्राप्त करून सखोल तपास करण्यात येत आहे.**

## जबरी संभोग

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक २५/०१/२०२३ चे १३/०० वा. ते दिनांक २५/०१/२०२३ चे १३/४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी/पिडीता वय १६ वर्ष हिचे विधीसंघर्ष बालक याच्या बहिणीशी मैत्री असुन विधीसंघर्ष बालक याचे घरी येणे जाणे असुन त्यातुन फिर्यादीची विधीसंघर्ष बालक याचेशी मैत्री झाली व त्याने फिर्यादीस प्रपोज करून फिर्यादीशी विधीसंघर्ष बालकाचे राहते घरी जबरदस्तीने शरीरसंबंध केले ज्यामुळे फिर्यादी ही ४ महिन्याची गर्भवती आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे विधीसंघर्ष बालक याचे विरूद्ध कलम ३७६ (३) भादवी सहकलम ४, ६ पोक्सो २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मॅडम पो.स्टे मौदा मो. क्र. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत गुरुकृपा किराणा समोर वार्ड क्र. ३ खापरखेडा येथे दिनांक १६/०५/२०२३ चे ०८/३० वा. ते ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश रामरावजी कुर्वे, वय ७८ वर्ष, रा. नविन नंदनवन प्लॉट नं ६२३ हनुमान मंदीर समोर नागपुर हा आपले रेडीमेट सुनिल ड्रेसेस दुकाना समोरील खाली जागेवर झाडु मारीत असता अनोळखी तीन ईसम यांनी आम्ही पोलीस आहोत असे बोलुन फिर्यादीचे हाताचे बोटामध्ये टाकलेली जुनी वापरती सोन्याची अंगठी ५ ग्रॅम वजनी अंदाजे किंमती ३,०००/– रु व एक सोन्याची अंगठी ४ ग्रॅम वजनी अंदाजे किंमती २४००/– रु ची अंगठी असे एकुण ९ ग्रॅमची एकुण किंमती ५४००/– रु चे अंगठया काढुन कागदाची पुडी बांधुन फिर्यादीच्या बॅग मध्ये ठेवली थोडयाच वेळाने फिर्यादीची बॅग अनोळखी ईसमाने आपल्या हातात घेतली व तुमच्या बॅग मध्ये ड्रग्स आहे का पाहु दया असे बोलुन फिर्यादीची बॅग चेक केली त्यावेळी त्याने बॅग मध्ये ठेवलेली अंगठी बांधलेली कागदाची पुडी काढुन घेतली व फिर्यादीला बॅग देवुन तेथुन निघुन गेले त्यानंतर फिर्यादीने आपली बॅग चेक केली असता त्यामध्ये ठेवलेली कागदाची पुडी काढुन बघितली तर त्या मध्ये अंगठया ऐवजी गोटे बांधले होते तेव्हा फिर्यादीने आरडाओरड करुन आरोपीचा पाठलाग केला असता आरोपी मिळुन आले नाही अशी फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४२०, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव पोस्टे खापरखेडा मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**